# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२०८ दिनांक-३०/०५/२०२४

## ज्वेलर्स दुकानाचे शटर तोडुन सोने चांदीचे दागीने चोरी करणा-या आरोपींना शिताफीने अटक करुन गुन्हा ऊघडकीस आणण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन घरफोडीच्या गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

**हकिगत :**

दि-१५/०५/२०२४ रोजी रात्री २१.३० वा ते दिनांक १६/०५/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. दरम्यान नालासोपारा पश्चिम नाकोडा ज्वेलर्स, या दुकानाच्या शटरची लोखंडी पट्टी तोडून आतमध्ये प्रवेश करुन कि रु १५,२७,७००/- चे सोन्या- चांदिचे दागिने व रोख रक्कम चोरी करुन नेले म्हणून फिर्यादी यांनी अज्ञात इसमाविरुध्द फिर्याद दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २०३/२०२४ भा.द.वी.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

**गुन्ह्याची ऊकल :**

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सि.सि.टी.व्ही. फुटेज मध्ये संशयीत आरोपीत निष्पन्न करुन तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन आरोपी नामे- १) मोहम्मद शाहीद अल्लादीन खान वय ४४ वर्षे, रा. मालाड पश्चिम, मुंबई २) शंकर मंजु गौडा वय ४९ वर्षे, रा. जि. चिकमंगळुर, राज्य कर्नाटक, ३) शमशुद दोहा रईस कुरेशी वय ३३ वर्षे, रा. एकता चौक, भिवंडी, जि. ठाणे यांना दिनांक २९/०५/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यांचेकडुन गुन्हा करणे करीता वापरेलेली बोलेरो कार व घर फोडीचे साहीत्य असा एकुण ५,४२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन खालील गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | नालासोपारा पोलीस ठाणे | २०३/२०२४ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० प्रमाणे |
| २ | होन्नाली पोलीस ठाणे (जि. दावणगेरे, राज्य कर्नाटक) | १३४/२०२४ भा.द.वी.सं. कलम ३७९ प्रमाणे |

नमुद आरोपीत यांनी जप्त करण्यैंत आलेल्या बोलेरो कारला विविध बनावट नंबर प्लेट लावुन अशाच प्रकारे मुंबई, भिवंडी, डोंबीवली परिसरात आणखी घरफोडी चोरीचे गुन्हे केले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीत पैकी शंकर मंजु गौडा याचेवर घरफोडी व दरोडया सारखे गंभीर गुन्हे नोंद असुन उक्त आरोपी यांना पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २०३/२०२४ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ / संतोष चव्हाण नेम - सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.


गुन्हे शाखा
मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय
विरार कक्ष - ३
CRIME BRANCH
VIRAR UNIT - 3
MH 14 BC 7050